महाराष्ट्र शासन

क्र. किसयो -२०१९/प्र.क्र.२० /११-अे
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०६ फेब्रुवारी, २०१९

प्रति,

१) आयुक्त (कृषि) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) सर्व विभागीय आयुक्त
३) सर्व जिल्हाधिकारी
४) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
५) सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी

विषय :- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना राज्यात राबविणेबाबत.

संदर्भ :- उपरोक्त विषयासंबंधी शासनाचे पत्र क्र. किसयो-२०१९/प्र.क्र.२०/११-अे,
दि.०४.०२.२०१९

महोदय,

संदर्भाधीन पत्रान्वये कळविल्यानुसार प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना राज्यात राबविणेबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५.०२.२०१९ रोजी दुपारी ४.०० वाजता व्हिडियो कॉन्फरन्सव्दारे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात येत आहे.

आपली,

(निता शिंदे)
अवर सचिव ,महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मुख्य सचिव महोदयांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२) सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदूम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३) निवड नस्ती (कार्यासन ११-अे).

**दि.०५.०२.२०१९ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दूरचित्रवाणीद्वारे (VC) आयुक्त कृषि, आयुक्त जमाबंदी, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि अमुस (वित्त) अमुस, मुख्यमंत्री कार्यालय व सचिव कृषि यांच्या उपस्थितीत आयोजीत केलेल्या बैठकीचे इतिवृत्त**

१) केंद्र शासनाने दि.१.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनास कळविल्यानुसार केंद्राने विहित केलेल्या निकषांनुसार योजना राज्यात राबविण्यासाठी दि.०४.०२.२०१९ रोजी निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकानुसार सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यात तात्काळ अंमलबजावणी करावी.

२) सदर योजना ज्या कुटुंबाचे (पती-पत्नी व त्यांचे १८ वर्षाखालील मुले) सर्व ठिकाणचे मिळून लागवडीलायक एकुण कमाल धारणक्षेत्र २ हेक्टरपर्यंत असेल, अशा कुटुंबांसाठी असल्याने शासन परिपत्रकातील विहित परिशिष्टांतील नमुन्यात सर्व संबंधित वहितीधारक खातेदार शेतकऱ्यांच्या संदर्भातील सविस्तर नोंदी ई-फेरफार संकेतस्थळ व कृषि गणना २०१५-१६ करिता उपलब्ध केलेल्या माहितीच्या आधारे संकलित करण्याची कार्यवाही ही कालबध्द स्वरुपात दिलेल्या वेळापत्रकानुसार पूर्ण होईल याची खात्री जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी करावी.

३) या योजनेची माहिती विविध प्रसारमाध्यमे जसे की वृत्तपत्रे, गावदवंडी, केबल टि.व्ही., प्रसिध्दीपत्रक इत्यादीच्या सहाय्याने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात यावी व त्याद्वारे शेतकऱ्यांना त्यांचा आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक व बँक खात्याशी संबंधित सविस्तर माहिती सादर करण्याचे आवाहन करण्यात यावे.

४) सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी ग्रामस्तरीय समित्या व सरपंच यांची बैठक आयोजित करुन त्यांना योजनेबाबत मार्गदर्शन करुन शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्यासाठी सहाय्य करण्याचे आवाहन करण्यात यावे.

५) या योजनेकरिता शेतकऱ्यांची सविस्तर माहिती संकलित करण्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ हे मनरेगा योजनेकरिता नियुक्त केलेल्या बाह्यस्रोत यंत्रणेद्वारे प्राप्त करुन घ्यावे.

६) सदर योजनेअंतर्गत माहिती संकलित करण्यासाठी व अन्य बाबींकरिता येणारा कार्यालयीन खर्च सद्यस्थितीत भागविण्यासाठी सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अखत्यारितील सेतू प्रकल्प निधीचा विनियोग करावा.

७) या योजनेसंदर्भातील माहिती संकलित करण्याचे काम व सध्या दुष्काळ निधी वाटप करण्यासाठी माहिती संकलित करण्याचे काम ही दोन्ही कामे समांतरपणे करण्यात यावीत. तसेच दुष्काळ निधी वाटप करण्यासाठी माहिती संकलित करण्यासाठी स्वतंत्रपणे शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

८) सदर प्रयोजनार्थ लेखाशिर्ष उघडण्यासाठी कृषि विभागाने आवश्यक ती तात्काळ कार्यवाही करावी.

९) तसेच सदर योजनेकरीता केंद्र शासनाच्या सुचनेनुसार मनरेगा योजनेच्या धर्तीवर सेंट्रल बँक ऑफ इंडिया मध्ये स्वतंत्र खाते (Notional Account) उघडण्यात यावे.

-------------------------------